राज्यातील नगरपरिषद / नगरपंचायतींमधील रिक्त अध्यक्ष व सदस्य पदांच्या पोटनिवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम - २०२४

निवडणूक प्राथम्य

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.६/का-६
नवीन प्रशासन भवन, पहिला माळा,
हुतात्मा राजगुरु चौक, गादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १२ जुलै, २०२४.

प्रति,

जिल्हाधिकारी,
रायगड, नाशिक, जळगांव, नंदुरबार, सांगली,
कोल्हापूर, यवतमाळ व नागपूर.

विषय :- राज्यातील नगर परिषद/नगरपंचायतींमधील रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०२४.

संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दि.२८/०६/२०२४ रोजीचा मतदार यादी कार्यक्रम.

महोदय/महोदया,

सोबतच्या **परिशिष्ट-२** मधील नगर परिषद / नगरपंचायतींमधील रिक्त अध्यक्ष पदाची व सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला होता. त्यानुसार अंतिम प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन दिनांक ११/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९ अ नुसार राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. आता, या पत्रान्वये नगरपरिषद/नगरपंचायतींमधील रिक्त अध्यक्ष/सदस्य पदांच्या पोट निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. रिक्त अध्यक्ष व सदस्य पदांच्या पोट निवडणुका असलेल्या नगर परिषद / नगर पंचयातींचा तपशील **परिशिष्ट-२** नुसार आहे.

४. राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. त्यांनी http://panchayatelection.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन त्यामध्ये स्वत:ची नोंदणी (Register) करुन घ्यावी व नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. त्यावर स्वाक्षरी करुन ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन पत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

५. निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता ही **हातकणंगले** नगरपंचायतीमध्ये रिक्त अध्यक्ष पदाची पोट निवडणूक असल्यामुळे संपूर्ण नगरपंचायत क्षेत्रामध्ये लागू राहील तसेच अन्य नगर परिषद/नगरपंचायतींच्या रिक्त सदस्य पदांची पोटनिवडणूक असलेल्या संबंधित प्रभागात लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

६. निवडणूक असलेल्या नगर परिषद/नगरपंचायतींमधील रिक्त अध्यक्ष व सदस्य पदाची पोट निवडणूक असलेल्या नगर परिषद/नगरपंचायतींच्या मतदार यादीसंदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द / स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

७. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे:-

संकेत स्थळ : https://www.mahasec.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्रमांक (नगरपालिका शाखा) : ०२२-२२०४५०७५
दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) : ०२२-२२८८६९५०
ई-मेल : sec.mh@gov.in

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

१२.०७.२०२४

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, (सर्व) (छत्रपती संभाजीनगर वगळून)
९) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक
१०) संबंधित नगर परिषद व नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.
१२) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१३) उप सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४) उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१५) सहायक आयुक्त, जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१६) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१७) निवड नस्ती (का.६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

# परिशिष्ट - १ (पोट निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.६/का.६, दि.१२/०७/२०२४ सोबतचे सहपत्र.)

राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सोबतच्या परिशिष्ट- २ मधील नमूद अध्यक्ष व सदस्य पदांच्या पोट निवडणुका-२०२४.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्याचा दिनांक | ११/०७/२०२४ (गुरुवार)<br>कार्यवाही पूर्ण |
| २ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | १६/०७/२०२४ (मंगळवार) |
| ३ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | १८/०७/२०२४ (गुरुवार) सकाळी ११.०० ते २४/०७/२०२४ (बुधवार) दुपारी ०२.०० पर्यंत |
| ४ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | १८/०७/२०२४ (गुरुवार) ते २४/०७/२०२४ (बुधवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत)<br>दि.२०/०७/२०२४ शनिवार, दि.२१/०७/२०२४ रविवार या सुट्टींच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. |
| ५ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २५/०७/२०२४ (गुरुवार)<br>सकाळी ११.०० वाजल्यापासुन |
| ६ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक<br>**अपील नसेल तेथे** | ३१/०७/२०२४ (बुधवार)<br>दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ६ - अ | **अपील असल्यास**<br>(i) **वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.**<br>(ii) **निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत.** | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. मात्र दिनांक ०२/०८/२०२४ (शुक्रवार) पर्यंत. |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ८ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | ११/०८/२०२४ (रविवार)<br>सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १२/०८/२०२४ (सोमवार)<br>सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| १० | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | कलम १९ मधील तरतुदीनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(स्वाक्षरी) १२.०७.२०२४

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट - २

## नगर परिषद / नगर पंचायतींची नावे

(रिक्त अध्यक्ष व सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.६/का.६, दि.१२/०७/२०२४ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | नगरपरिषद / नगरपंचायतींचे नाव | न.प./न.पं. च्या रिक्त अध्यक्ष व सदस्य पदांची पोट निवडणूक असलेले प्रभाग व जागा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | रायगड | खालापूर | प्रभाग क्रमांक - १ |
| | | पाली | प्रभाग क्रमांक - १० |
| २ | नाशिक | निफाड | प्रभाग क्रमांक - ५ |
| | | सुरगाणा | प्रभाग क्रमांक - १६ |
| ३ | जळगाव | बोदवड | प्रभाग क्रमांक - ४ |
| ४ | नंदुरबार | धडगांव-वडफळ्या-रोषमाळ बु. | प्रभाग क्रमांक - १४ |
| ५ | सांगली | कवठेमहांकाळ | प्रभाग क्रमांक - ७ |
| | | खानापूर | प्रभाग क्रमांक - १७ |
| ६ | कोल्हापूर | हातकणंगले | थेट अध्यक्ष |
| | | चंदगड | प्रभाग क्रमांक - ५ |
| ७ | यवतमाळ | बाभुळगांव | प्रभाग क्रमांक - १ |
| ८ | नागपूर | कन्हान-पिपरी न.प. | प्रभाग क्रमांक - ७-अ |

(signature)

१२.०७.२०२४